प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. ०६.१०.२०२१**

**सिडकोतर्फे ०८ ऑक्टोबर २०२१ रोजी "सिडको इन्व्हेस्टमेन्ट ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर समीट (आभासी)" चे आयोजन, नवी मुंबईतील गुंतवणूकीच्या संधींचा घेण्यात येणार आढावा**

सिडको महामंडळातर्फे ०८ ऑक्टोबर २०२१ रोजी सिडको इन्व्हेस्टमेन्ट ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर समीट (आभासी-व्हर्च्युअल) चे आयोजन करण्यात आले असून नवी मुंबईमध्ये उपलब्ध असलेल्या गुंतवणुकीच्या विविध संधींविषयी या कार्यक्रमात चर्चा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात स्वतंत्र आणि समर्पित सत्रांमध्ये नवी मुंबईमध्ये यापूर्वीच ज्यांनी गुंतवणूक केली आहे असे गुंतवणूकदार नवी मुंबईत गुंतवणूक करण्याचे फायदे आणि नवी मुंबईमध्ये गुंतवणूक करण्याकरिता सर्वसाधारण माहिती याविषयी सर्वसाधारण जनतेशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमात नियोजित काळात विविध प्रकल्प पूर्ण करण्याच्या सिडकोच्या क्षमता आणि नवी मुंबईमध्ये सिडकोकडून करण्यात आलेली बांधकामे आणि विकास याबद्दलही माहिती देण्यात येणार आहे. तसेच नवी मुंबईतील आतिथ्य, आरोग्य, शिक्षण, क्रीडा व इतर क्षेत्रांचा विकास सुकर व्हावा, याकरिता सिडकोने हाती घेतलेल्या विविध विकास प्रकल्पांबद्दलही या कार्यक्रमात माहिती सांगण्यात येणार आहे.

सिडकोने नेहमीच नवी मुंबईच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित केले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सिडकोने अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले आणि नवी मुंबईतील जीवनमान उंचवाण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास केला. महागृहनिर्माण योजना, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नवी मुंबई मेट्रो, कॉर्पोरेट पार्क इ. प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर असून या प्रकल्पांमुळे नवी मुंबईतील पायाभूत विकास क्षेत्रात आमूलाग्र बदल घडून येणार आहेत. तसेच सिडकोने शहराला उत्तम संधानता (कनेक्टिव्हिटी) लाभण्यावर लक्ष केंद्रित केल्यामुळे भावी गुंतवणूकदारांना गुंतवणुकीच्या उत्तम संधी उपलब्ध होणार आहेत.

सदर कार्यक्रम हा सिडको आणि भावी गुंतवणूकदार, विकासक, बांधकाम कंपन्या व संघटना यांदरम्यान संवाद प्रस्थापित करण्याकरिता उचललेले महत्तवाचे पाऊल आहे. यामुळे सिडकोला नवी मुंबईमध्ये गुंतवणुकीच्या व्यवहार्य आणि आकर्षक संधी निर्माण करण्याकरिता उपाययोजना आणि धोरण आखण्यास मदत होणार आहे.

या कार्यक्रमास सिडकोतील अधिकाऱ्यांसह NAREDCO, CREDAI, MCHI सारख्या नामांकित संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असून आपले विचार ते या कार्यक्रमाच्या माध्यमातून मांडणार आहेत.

तसेच शिक्षण, आरोग्य, परिवहन आणि क्रीडा क्षेत्रांतील प्रतिनिधीही उपस्थित राहून आपले विचार मांडणार आहेत.

सदर कार्यक्रम (समीट) हा सर्व गुंतवणूकदार आणि सर्वसामान्य नागरिकांकरिता खुला असून या कार्यक्रमास उपस्थित राहण्याकरिता **https://avtaar.eletsonline.com/cidco/registration** या संकेतस्थळावर नोंदणी करण्यात यावी. कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी **http://cidco.eletsonline.com** या संकेतस्थळाला भेट द्यावी.

---

**मा. संपादक महोदय,**
**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

जनसंपर्क विभाग, सिडको